# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालय**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक २८.०४.२०२३ शुक्रवार**

**(अनोळखी मर्ग)**

**मृत इसमांची ओळख व नातेवाईकांचा शोध होणेबाबत :**

**१) धंतोली** :– दिनांक ०३.०३.२०२३ चे १९.०० वा चे दरम्यान अंदाजे ५५ ते ६० वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हे पो.स्टे. धंतोली हद्दीत राहाटे कॉलोनी, गोरक्षण समोर, वर्धा रोड, धंतोली, नागपूर येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आला असुन त्यांना उपचाराकामी मेडीकल हॉस्पीटल येथे भर्ती केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना दि ०२.०४.२०२३ चे २३.३० वा तपासुन मृत घोषीत केले. **मृतकाचे वर्णन** – रंग सावळा, चेहरा लांब, बांधा मजबुत, केस काळे पांढरे वाढलेले, दाढी मिशी काळी पांढरी वाढलेली, अंगात– सफेद रंगाचा शर्ट व काळा रंगाचा पॅन्ट घातलेला होता.

**२) सक्करदरा** :– दिनांक ०३.०४.२०२३ रोजी अंदाजे ६० ते ६५ वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हा पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत समोसा ग्राउंड, मोठा ताजबाग येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीत मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. **मृतकाचे वर्णन** – रंग निमगोरा, चेहरा लांबसर, बांधा सडपातळ, केस पांढरे वाढलेले, दाढी मिशी पांढरी वाढलेली, उंची ५ फुट, असून अंगात– दवाखान्याचे कपडे घातलेला होता.

**३) अजनी** :– दिनांक २७.०३.२०२३ चे १२:३० वा चे सुमारास अंदाजे ३४ ते ३५ वर्ष वयोगटातील एक अनोळखी पूरूष ईसम हा पो.ठाणे. अजनी हद्दीत मेडीकल हॉस्पीटल, अपघात विभागाचे समोरील गार्डनचे फुटपाथवर बेशुध्द अवस्थेत मिळून आला त्यांना उपचार कामी मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. **मृतकाचे वर्णन** – रंग सावळा, चेहरा लांबट, बांधा मजबुत, केस पांढरे, दाढी पांढरी वाढलेली, उंची ४ फुट ५ इंच, अंगात– पांढरे रंगाची सॅन्डो बनियान व काळा रंगाचा फुल पॅन्ट घातलेला होता.

**४) सोनेगाव** :– दिनांक २५.०३.२०२३ चे रात्री २०.०० वा चे सुमारास अंदाजे ६० वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हा पो.स्टे. सोनेगाव हद्दीत चिंचभवन हॉटेल चूल्हा मागे रेल्वे ट्रॅक डाउन पोल क्र. ८२५/३० ते ८२५/२८ च्या मध्ये रेल्वे ने अपघात होवुन बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यास उपचार कामी मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले. **मृतकाचे वर्णन** – बांधा मजबुत, उंची ५ फुट, दाढी पांढरी वाढलेली, असून अंगात– पांढऱ्या रंगाची शर्ट व पांढऱ्या रंगाचा पॅन्ट घातलेला होता.

**५) <u>लोहमार्ग</u>** :— दिनांक १३.०४.२०२३ चे ०७.१५ वा चे पुर्वी अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हे रेल्वे स्टेशन बोरखेडी कि.मी न. १०८/०१ रेल्वे क्रॉसिंग गेट जवळ रेल्वे ने अपघात होवुन मृत अवस्थेत मिळुन आला असुन. **<u>मृतकाचे वर्णन</u>** — चेहरा लांबट, बांधा सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच, केस काळे बारीक, दाढी मिशी बारीक, असून अंगात— काळे लाल रंगाचे फुलबाहीचे जॅकेट ठिकठीकानी फाटलेले होते.

**६) <u>सिताबर्डी</u>** — दिनांक ३१.१२.२०२२ रोजी अंदाजे ६० वर्ष वयोगटातील एक अनोळखी महिला हया पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत गणेश तेकडी मंदीर उड्डानपुलाखाली, दुकान न. ६४, रेल्वे स्टेशन रोड समोरील फुटपाथवर बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचारासाठी मेयो हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. **<u>मृतकाचे वर्णन</u>** — रंग निमगोरा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, केस काळे पांढरे, अंगात— पांढरे कपडे दवाखान्याचे दोन्ही दोन्ही पायात पायपट्टया, उजवे पायाला जख्म बॅडेज बांघलेले होते. डावे पायात काळा धागा बांधलेला होता.

**७) <u>धंतोली</u>**:— दिनांक १८.०४.२०२३ रोजी १०.४५ वा चे दरम्यान अंदाजे ५० ते ५५ वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हे पोलीस ठाणे हद्दीत नविन एन.एम.सी पुलाखाली मृत अवस्थेत मिळून आला असुन **<u>मृतकाचे वर्णन</u>** — रंग सावळा, चेहरा चापट, बांधा सडपातळ, उंची ५ फुट ८ इंच, असून अंगात— निळया रंगाची लुंगी घातलेला होता. हातात पांढऱ्या धातुचे कडा, डावे पायाला गुडघ्या पासुन ते पंज्यापर्यत प्लास्ट केलेले होते.

**८) <u>कोराडी</u>** :— दिनांक २३.०३.२०२३ रोजी १४.०० वा. अंदाजे ५० ते ५५ वर्ष वयोगटातील एक अनोळखी बेवारस महिला ही पो.ठाणे. कोराडी हद्दीत सुरादेवी गाव, बस स्टॉप जवळ बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल वार्ड क्र. ३, येथे दाखल केले असता डॉक्टरांनी दि. २८.०४.२०२३ चे २२.०० वा तपासुन त्यांना मृत घोषीत केले. **<u>मृतकाचे वर्णन</u>** — रंग सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, केस काळे लांब, हाताचे पंज्यावर टीब टीब असे गोंदलेले, कपाळावर काळा टिका, नाकात पांढऱ्या धातुचा खडा होता.


१


२


३


४


५


६


७


८